नियमीत दिवाणी दावा क्रमांक ११०/२०१२

निशाणी ४३ वरील आदेश

१. प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनाचा व कायम मनाईचा असून प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज जादा मुददे काढणेसाठी केला आहे. प्रतिवादीने तीन जादा मुददे सुचविलेले आहेत

२. वादी ने निशाणी ४५ कडे म्हणणे देवून सदर अर्जास विरोध केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार कैफियतीमध्ये तशी कथने नसल्यामुळे प्रतिवादी म्हणतात तसे मुददे काढण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे वादीने सदरचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सुचविलेल्या मुददा क्रमांक १ बाबत वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्यास कारण दावा दाखल करणेपूर्वी एक महीना अगोदर घडले आहे. याउलट कैफियतीचे अवलोकन कले असता प्रतिवादीने दावा मुदतीत नाही अशी मोघम हरकत (evasive denial) घेतली आहे. दावा मुदतीत आहे किंवा नाही हे केवळ वादपत्रातील कथनावरुन ठरवता येते. मुदतीच्या कायदयाप्रमाणे दावा जर मुदतीत नसेल तर प्रतिवादीने त्याबाबत हरकत घेतली नाही तरी दावा चालविता येत नाही. पंरतु प्रस्तुत दाव्यातील वादपत्राचे अवलोकन केले असता दावा मुदतीत असल्याचे दिसून येते. प्रतिवादीने त्यास मुदती बाबत हरकत घेणेची असलेस दि. प्र. संहिता क्रम ८ नियम ३ व ४ प्रमाणे प्रतिवादीने फक्त वादीचे कथन नाकारुन चालत नाहीत तर त्याबाबत त्यांनी प्रतिउत्तरही(answer to the point of substance) देणे आवश्यक आहे. तसे प्रतिउत्तर प्रतिवादीने दिलेले नसल्यामुळे मुदतीबाबत मुददा काढणेची आवश्यकता नाही.

४. प्रतिवादीतर्फे त्याने सुचविलेल्या मुददा क्रमांक २ व ३ बाबत असे सांगण्यात

आले की, वादीने शासनाचे रस्त्याची जागा स्वतःची असले बाबत हक्कज्ञापन मागीतले असल्याने महाराष्ट्र शासन व ग्रामपंचायतीला ही पक्षकार करणे जरुरीचे आहे. तसे त्यांना पक्षकार केलेस या कोर्टास दावा चालविणेचा अधिकार राहत नाही. तसे त्यांने कैफियतीमध्ये कथन केले आहे. सदर हरकतीबाबत वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने दावा मिळकत ही वादींची पूर्वापार खाजगी मालकी व वहीवाटीची आहे असे कथन केले आहे. प्रतिवादी म्हणतो तसे वादीने शासनाच्या रस्त्याची जागा स्वतःची असले बाबत वादपत्रात कोठेही कथन केलेले नाही. महाराष्ट्र शासन व ग्रामपचायतीला पक्षकार केले नसल्यामुळे दाव्यास non–joinder of necessary party ची बाधा येते किंवा काय याबाबत निशाणी ४० कडे अलाहिदा मुददा काढलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या अधिकारक्षेत्रा बाबतच्या हरकतीवरुन त्याने सुचविलेले मुददा क्रमांक २ व ३ काढणेची आवश्यकता नाही.

५. वरील परीस्थिती व कारणांचा विचार करुन पुढील प्रमाणे आदेश करणेत येतो –

अर्ज नामंजूर करणेत येतो.

सही/
दिनांकः १९/०१/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
कुरुंदवाड